

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.
IRBK-0108813

# माझे उंबरखेडे

— जा. सं. त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

CC93

नवसाक्षर प्रौढासाठी *

# माझे उंबरखेड

• लेखक

जा. सं. तडवी

• किंमत

३० नवे पैसे

• द्वितीय श्रेणी

IRBK-0108813

विद्या प्रकाशन

४५० बुधवार पेठ, पुणें २.

● ● प्रकाशक ● ●

व्ही. आर. शिंगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

● ● मुद्रक ● ●

व्ही. आर. शिंगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

30120 22९6 ४।४।५९

# माझे उंबरखेडे

## १

महारू पाटील आज उंबरखेडयाला आले. चाळीस वर्षांनी आले. मोटारीने आले. मोटार गावात मध्यभागी उभी राहिली. पाटील खाली उतरले. भोवताली पाहू लागले. ते चमकले. त्याना फसल्या-सारखे वाटले. " आपण भलत्याच गावी उतरलो. हे गाव आपले नाही. " असे ते म्हणाले.

अड्ड्यावर संत्री विकणारा पोरगा होता. आठ दहा वर्षांचा असेल तो. त्याला पाटलाने विचारले, " उंबरखेडे एथून किती लांब आहे ? हे गाव कोणते ?" पोरगा बोलला, " हेच उंबरखेडे. तुम्हाला कोणाकडे जायचे ? " महारू पाटील म्हणाले, " बाळ, हे उंबरखेडे

नाही. मला उपखेडयाजवळचे उंबरखेडे पाहिजे. गिरणेच्या काठचे उंबरखेडे पाहिजे. तेथे मला जायचे आहे. या तुमच्या सुंदर खेडयाला उतरलो. मला रस्ता दाखव. ”

संत्रीवाला जीव तोडून सांगू लागला, “ बाबा, हेच उंबरखेडे. ” महारू पाटलाला नवीन उंबरखेडे पटेना. मुलाला पूर्वींचे उंबरखेडे माहीत नव्हते. पूर्वींचे उंबरखेडे गिरणा नदीच्या काठी होते. समोर उपखेडे दिसत होते. गिरणेला मोठा पूर येई. रेल पडे. तेव्हां गावात पाणी शिरे. घरे वाहात. गुरे वाहात. माणसे वाहून जात. फार हानी होई. गावाला चिंता पडे. सरकारला काळजी वाटे. सरकारने गाव उठविले. वर लांब नवीन वसविले.

## २

महारू पाटलांचा जन्म जुन्या उंबरखेडयात झाला होता. ते दहा वर्षांचे होते तेव्हां ते पोरके झाले. त्याना मावशीने आपल्या घरी नेले. मावशीचे गाव साताऱ्याकडे होते. मावशीकडे त्यांचा जन्म शेतावर गेला. मावशीची नात नुकतीच उंबरखेडयाला दिली होती. तिला घ्यायला व जुन्या मंडळीला

भेटायला ते आले. चाळीस वर्षांनी आले. त्याना काय माहीत की गाव वाहून गेले – नवीन वसविले!

संत्रीवाल्याने कोणाकडे जायचे वगैरे चौकशी केली. महारू पाटील जुन्या लोकांची नावे सांगत. मुलाला ती माहीत नव्हती. मुलगा नवी नावे सांगे. पाटलाला ती नवी वाटत.

अड्ड्यावरून ते निघाले. समोरच जीभाऊ ओट्यावर होते. पाटलानी त्याना रामराम केला. उंबरखेडयाचा रस्ता विचारला. जीभाऊही गोंधळात पडले. त्यानी सांगितले, "हेच उंबरखेडे. तुम्हाला कोणाकडे जायचे?" पाटील म्हणाले, "साहेबराव अण्णाकडे!"

जीभाऊ चरकले. ती जुनी माणसे होती. ते गावचे पुढारी होते. त्यानी सांगितले, "अण्णा वारले. त्यांचा नातू मोतीराम आहे. माधवबापुंचा मुलगा. तो कोण तुमचा?" "नात्यातला आहे." पाटील म्हणाले.

जीभाऊनी पाटलाला सोबत दिली. महारू पाटील अण्णांचे घरी आले. तेथे एक मुलगी रांगोळी काढीत होती. तिचे नाव हिराबाई. हिराने पाहुण्याला

'मामा' म्हणून ओळखले. मामाला घरात आणून बसविले. कारभाऱ्याला पाहुण्याबद्दल सांगितले. तिने चहा केला. आंघोळीची व्यवस्था केली. जेवण झाल्यावर मामाने विश्रांति घेतली.

## ३

चार वाजता मामाना जीभाऊनी चहाला बोलाविले. जुनी जुनी दोन चार माणसेही होती मामा ओळख देऊ लागले. कांहीना आठवे कांहीना आठवेना.

महारू पाटलाना गाव पाहून फारच अचंबा वाटला. पूर्वीची ओबडधोबड घरे आठवली. खाच-खळग्यांचे लहान रस्ते आठवले. दारापुढची डबकी आठवली. महादेवाचे देऊळ आठवले. नदीकाठचा वड आठवला. गोठाण आठवले. नदी आठवली. कशाचाच कांही मेळ बसेना.

एथे पाहिले तर स्वच्छ नी लांब रुंद रस्ते. आखलेली घरे. बांधलेल्या गटारी. मधोमध बाग व मोठी जागा. गुजरी आणि मंडई.


चहा घेता घेता मामा मंडळीस म्हणाले, " आपले हे गाव कसे काय बांधले ? मला गाव पाहायचे आहे. " जीभाऊनी गावाची माहिती दिली. ते म्हणाले, " बरीच वर्षे झाली. रेल पडली. फार नुकसानी झाली. सरकारने नवी जागा दिली. आखणी केली. पाटलाच्या म्हणण्याप्रमाणे सर्व गावाने होकार दिला. गाव नवीन वसविले. महादेवाचे देऊळ बांधले. बालाजीचे मंदिर बांधले. "

मामा म्हणाले, " सडकेपावेतो रस्ता नव्हता. तो कसा झाला ? " जीभाऊ म्हणाले, " आजूबाजूस १५–१६ गावे आहेत. गाव मध्यभागी आहे. गावकऱ्याना वाटले, पक्का रस्ता व्हावा. गावकऱ्यानी अंगमेहनतीने ही दोन मैल सडक केली. सरकारची थोडी मदत मिळाली. चला गावात फिरू. "

## ४

उंबरखेड आदर्श खेडे. लांबचा पाहुणा आलेला. त्याच्याबरोबरची सर्व मंडळी निघाली. ती ग्रामपंचायतीचे कचेरीत आली. मामा कचेरी पाहून थक्कच झाले. ग्रामपंचायत १९४२ साली झाली. ५–७ वर्षातच ३ हजारांची सुंदर इमारत बांधली.

मामांच्या डोळ्यापुढे एक भिंत पडलेली व धावे बसलेली, मोडकी, जुनी चावडी उभी राहिली. केवढा फरक वाटला



शेजारीच लांबलचक मोठी तांबडी इमारत दिसली. ती शाळा होती. बारा खोल्या होत्या. ३५ हजार रुपये तिला लागले.

मुले खेळायला सुटली. धर्मशाळेतील मुले आली. उर्दू शाळेची आली. मुलीहि आल्या. मोकळ्या मैदानात मुले खेळू लागली. ते पाहून मामा मनात म्हणाले, " आमच्या वेळी शाळा

नव्हती. तेव्हांची गुरे वळणारी आम्ही पोरे आणि आताची शाळा शिकणारी मुले. किती फरक पडला!

ही मुले किती चपळ दिसतात! किती तरतरीत दिसतात! किती झकास! नाहीतर आम्ही होतो उघडे नागडे! धुळकट! मळकट! वारे वा गाव!!"

मामा मुलांचे खेळ पाहात होते. खेळताना एक मुलगा पडला. त्याच्या डोक्यातून रक्त निघू लागले. बालवीरानी त्याला लगेच दवाखान्यात नेले. मामाही तेथे गेले. दवाखाना पाहून मामा चकित झाले. " आईबाप आजारी होते, तेव्हां त्याना औषध मिळाले नाही. जवळ वैद्य नव्हता. चाळीसगावला जावे लागे. पैसा नव्हता." हे त्याना आठवले. जीभाऊ म्हणाले, " हा दवाखाना जिल्हा बोर्डाचा आहे. वैद्याचा आहे. १०-१५ खेड्याना ह्याचा उपयोग होतो. "

दवाखान्यातून ते बाहेर पडले. तोच शेतकऱ्यांचे सातारी बोलणे ऐकू आले. मामा इकडे तिकडे पाहू लागले. जीभाऊ म्हणाले, " रेडिओ सुरू आहे. गाव-कऱ्याना माहिती दिली जात आहे. ग्रामपंचायतीने रेडिओ घेतला आहे. "

: ५ :

मामा म्हणाले, " जीभाऊ, गावकऱ्यानी म्हणजे ग्रामपंचायतीने काय काय केले ते तरी सांगा. " जीभाऊ म्हणाले, " गावकऱ्यानी गाव सुधारले आहे. खूप नव्या नव्या गोष्टी केल्या आहेत. हे रस्ते केले. २५०० पक्क्या गटारी केल्या. ६००० कच्च्या गटारी केल्या. सांडपाण्याची चांगली सोय केली. पूर्वीची घाण पाण्याची डबकी गेली. "

असे बोलत ते जात होते. वासावरून मामानीच विचारले, " एथे लोक बाहेर येतात वाटते ?" जीभाऊ म्हणाले, " होय. हे संडास. आडोशाचे ४ व चराचे ५४ संडास तयार केले. दहा हजार रुपये खर्च केले आहेत. " हे ऐकून मामा म्हणाले, " परसाकडची सोय दहा हजार रुपयात ? एकापरी बरेच म्हणायचे. आपल्या खेडेगावी चारी बाजूला नुसती घाण. नाक धरवत नाही हातात. गावात शिरायचे म्हणजे नाकाला पदर लावूनच ! "

जीभाऊ म्हणाले, " खर्च वाया गेला नाही. आम्हाला दरसाल या सोनखताची बरीचशी रक्कम मिळते. कंपोस्ट खताचेही हजार बाराशे खड्डे आहेत.

गावाबाहेर लोक पाणी भरत होते. तिकडे बोट करून तात्याजी म्हणाले, "ही आमची गैरसोय आहे. पण ती आम्ही नळ आणून दूर करणार आहोत. एक लाखाची योजना आहे. निम्मे पैसे आम्ही जमवीत आहोत."

इतक्यात विहिरीजवळ दिवा लागला. ते पाहून मामा म्हणाले, "देवळात दिवा लावायचा सोडला आणि हा माणूस एथे दिवा लावतो! वेडा आहे!"

त्यावर जीभाऊ म्हणाले, "मामा, हा माणूस वेडा नाही. तो ग्रामपंचायतीचा शिपाई आहे. हा दिवा ग्रामपंचायतीचा आहे. असे दिवे सगळ्या गावात आहेत. देवळाजवळही आहेत. लवकरच आम्ही विजेचे दिवे लावू."

६

रात्री मामा बालाजीच्या देवळात भजन ऐकायला गेले. 'झाला महार पंढरीनाथ' हे भजन ऐकताना मामा गुंगून गेले. शेजारच्या माणसाला मामानी विचारले, "भजनी मंडळी कोठली?" शेजारी म्हणाला, "एथलीच हरिजन मंडळी. तंबोरी

घेतलेला रामलाल भंगी. पेटी वाजविणारा हरी महार. तबला वाजविणारा केरू मांग. पखवाज वाजविती तो केशव चांभार. भजन म्हणणारी मुलगी हरी महाराची सीता. फार चांगली भजनी मंडळी आहे. गावोगावचे आमंत्रण येते."

वीज पडावी नि धक्का बसावा तसे मामा गप्प बसले होते. ते म्हणाले, "देवळात महार, मांग, भंगी?" शेजारी म्हणाला, "मग काय झाले? मी स्वतः ब्राह्मण पुजारी आहे. आमच्या गावात उच्चनीच हा भेदभाव नाही. ग्रामपंचायतीने मध्यवस्तीत हरिजनांना घरे बांधून दिली. हरिजन बंधु आमच्या एथे घरकामाला आहेत."

मामाला रात्री झोप लागेना. 'आपले जुने गाव आणि हे नवे गाव. हरिजन, देऊळ, भटजी, सुधारणा डोळ्यापुढे येत.' 'झाला महार पंढरीनाथ' म्हणत त्यांचा डोळा लागला.

## ७

दुसरे दिवशी न्याहरी झाली. भाची व जावई यांच्याशी मामा खूप बोलले. मामा बोलले, "एथून जाऊच नये असे वाटायला लागले."

भाची व जावई दोघेहि म्हणाली, “ राहाच मामा एथे.”

जावई आपल्या गावची सुधारणा सांगू लागले. “पुढाऱ्यानी जीभाऊंच्या सांगण्याप्रमाणे अनेक सोसायट्या काढल्या. खूप पैसा घातला. लोकाना शिकविले. लोकांची स्थिति सुधारली. त्यानी कर्ज फेडले. शेती सुधारली. गावाचे नाव लांबवर गेले.

आमची ‘ श्रीशिवाजी विविध कार्यकारी सोसायटी ’ पाच लाखांची उलाढाल करते. सोसायटी शेतकऱ्यांचा माल विकते. कर्ज देते. धान्य दुकान, किराणा दुकान, कापड दुकान चालविते. विमा उतरविते.

पाटबंधारा सोसायटीने गिरणा नदीवर एंजिन बसविले. पंपाने ७५ एकर जमीन भिजते. गावाने वीस हजार रुपये खर्च केले. सरकारी मदतही मिळाली. सहकारी सोसायटी कमी दराने कर्ज देते. भाड्याने नांगर पुरविते. पीक संरक्षक सोसायटी पिकाच्या राखणीकरिता पहारेकरी ठेवते.

सामुदायिक सोसायटी तर विशेष आहे. तिने उपखेडे जंगलात ४९६ एकर जमीन मिळविली. तेथे सहकारी शेती केली. हे सर्व पाहून या.

मामा, ही सोसायट्यांची थोडी माहिती दिली. आणखी कांही गोष्टी ऐका. खिल्लारी गुरांची निपज करण्याकरिता व शेळ्या–मेंढ्यांची निपज चांगली होण्यासाठी उत्तम जनावरे ठेवली आहेत. गुरासाठी हिरवा चारा साठविला आहे. त्याना धुण्यासाठी औषधी पाण्याचा हौद आहे. गुरांचा सामुदायिक गोठा बांधला आहे. तेथील गुरांच्या मूत्रापासून हिराखत करतात.

वनमहोत्सव करून ४–५ हजार झाडे वाढविली आहेत. गावातील कारागिराना कामधंदा दिला आहे.

कलापथक आहे. ते नाटके व करमणूक करते.

श्रीशिवाजी वाचनालयात लोक वाचायला जातात. रात्रीची शाळा आहे. तेथे मोठी माणसे शिकतात. आणखी पुष्कळ सुधारणा केल्या आहेत.

मामा, आमच्या गावचे शेतकरी फार हुशार. त्यानी एकेका एकरात माप पीक काढले आहे. त्याना मोठाली सरकारी बक्षिसे मिळाली आहेत. या गावाला पुढे आणले असेल तर रामराव जीभाऊनी. ते शेतकरी आहेत. मोठे कर्तबगार आहेत. सरकार दरबारी त्यांचे खूप वजन आहे. आपल्या गावची चलती लोकानी पाहिली. आणि शेजारच्या गावानीहि आपली सुधारणा केली. आपल्या गावाने किती तरी बक्षिसे मिळविली. ढाली मिळविल्या.



सरकारने गाव आ र्श खेडे ठरविले. मुंबई सरकारने फोटो घेतले. दिल्ली सरकारनेही फिल्म घेतली."

जावईबुवा बोलत होते. मामा ऐकत होते. त्याना कांही कळे, कांही कळत नसे. हूं हां म्हणत. मामांच्या डोळ्यापुढे गाव उभा राही. "हेच माझे गाव – नवे गाव! मी – जुना–पिकले पान! या नव्या गावातच ते पडावे! मी आता मावशीकडे जात नाही. भाचीला पोचवायला जावयालाच पाठवितो.

हाच माझा गाव.
आदर्श खेडे.
उंबरखेडे.

एथेच मी राहणार.
एथेच मरणार"

अनुक्रम 30326
विभाग
क्रमांक
नों. दि.

IRBK-0108813



( महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीच्या सौजन्यानें )


● ● प्रकाशक ● ●

व्ही. आर. शिगरे,

विद्या प्रकाशन,

४५० बुधवार पेठ, पुणें २.

● ● मुद्रक ● ●

व्ही. आर. शिगरे

सर्वोदय मुद्रणालय,

४५० बुधवार पेठ, पुणें २.